दैनिक

बीड महाराष्ट्र | शनिवार, 12 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 122 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN NO. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM




# पुढील दोन वर्षांत जालना जिल्ह्यातील पाचशे जिल्हा परिषद शाळांचा दर्जेदार विकास करा

## आढावा बैठकीत पालकमंत्री ना . पंकजाताई मुंडे यांचे निर्देश

### 'नवीन वर्षात नवी शाळा' या संकल्पनेसह राज्याने जालन्याचा आदर्श घ्यावा असे काम करा

मुंबई | जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांचा दर्जा उंचावून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासह आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून करून देण्यासाठी सर्वसमावेश आराखडा तयार करावा. पुढील दोन वर्षांत जिल्ह्यातील पाचशे शाळांचा दर्जेदार विकास करण्याचे नियोजन करावे, असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज दिले. नवीन वर्षात नवी शाळा' या संकल्पनेसह राज्याने आदर्श घ्यावा असे काम करा अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत जालना जिल्हा परिषद शाळांच्या विकासकामांचा पुन्हा एकदा आढावा घेतला. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरिष बनसोडे, मनपा आयुक्त अंजली शर्मा यांच्यासह विविध अधिकारी दृरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. यापूर्वीही १ सप्टेंबर रोजीच्या बैठकीत पंकजाताई मुंडे यांनी जिल्हा परिषद शाळांचा आढावा घेऊन सूचना केल्या होत्या. त्यावेळी त्यांनी शाळांचा सर्वेकरून अहवाल देण्याचे निर्देश दिले होते. आज त्यावर चर्चा करून त्यांनी महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

### शाळांचा निधी जागरूकतेने खर्च करा

शाळा आणि अंगणवाड्यांच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध होणारा निधी नियोजनबद्ध, काटेकोर आणि परिणामकारक पद्धतीने खर्च करावा. शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा निर्माण करण्याबरोबरच विकासकामांचा दर्जाही उत्तम राखावा. जिल्ह्यातील शाळांचा विकास करताना आदर्श शाळेची संकल्पना डोळ्यासमोर ठेवावी. शाळांची आकर्षक रंगरंगोटी, उत्तम परिसर, आवश्यक पायाभूत सुविधा आणि दर्जेदार कामांवर भर द्यावा. जालना जिल्ह्यात विकसित होणाऱ्या या आदर्श शाळांचे अनुकरण राज्यातील तसेच इतर राज्यांतील शाळांनी करावे, अशा गुणवत्तेचे काम झाले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### नवीन वर्षात नवी शाळा

'नवीन वर्षात नवी शाळा' ही संकल्पना घेऊन संबंधित यंत्रणांनी अभियान स्वरूपात काम करावे. शाळांच्या विकासकामांबाबत पुढील आढावा बैठक आपण स्वतः जालना येथे घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी जिल्ह्यातील नावीन्यपूर्ण योजनांतर्गत सुरू असलेल्या विविध कामांचाही आढावा घेतला. या योजनांसाठी उपलब्ध निधी निर्धारित वेळेत खर्च करावा. मंजूर कामांना कोणत्याही प्रकारचा विलंब होणार नाही, याची दक्षता घेऊन ती गुणवत्तापूर्ण आणि वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# शांतता कमिटीची बैठक की केवळ सोपस्कार?

## गणेशोत्सव मंडळे, प्रतिष्ठित नागरिकांना कल्पना न देता मोजक्याच उपस्थितीत बैठक; पत्रकारांनाही निमंत्रण नसल्याने चर्चेला उधाण

**आष्टी | प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरासह ग्रामीण भागात शांतता, सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस प्रशासनाकडून शांतता कमिटीच्या बैठकीला विशेष महत्त्व दिले जाते. मात्र, आष्टी पोलिसांनी घेतलेल्या एका बैठकीच्या कार्यपद्धतीवरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, ही बैठक नेमकी शांतता कमिटीची होती की केवळ औपचारिकता म्हणून पार पाडलेला सोपस्कार, असा सवाल सामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

गणेशोत्सवाच्या सुरुवातीच्या काळात गणेश मंडळांचे पदाधिकारी, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी, युवक तसेच विविध घटकांशी संवाद साधून संभाव्य अडचणी, वाहतूक व्यवस्था, मिरवणुकीचे नियोजन, ध्वनिप्रदूषण, सुरक्षेचे उपाय आणि सामाजिक सलोखा याबाबत चर्चा होणे अपेक्षित असते. मात्र, आष्टी पोलिसांनी आयोजित केलेल्या बैठकीबाबत अनेक गणेशोत्सव मंडळांना तसेच सर्वसामान्य व प्रतिष्ठित नागरिकांना कोणत्याही स्वरूपाची पूर्वकल्पना देण्यात आली नसल्याची चर्चा आहे.

विशेष म्हणजे, सामाजिक सलोखा आणि प्रशासन व नागरिकांमधील संवादाचा महत्त्वाचा दुवा मानल्या जाणाऱ्या पत्रकारांनाही या बैठकीचे निमंत्रण देण्यात आले नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पोलीस प्रशासन आणि प्रसारमाध्यमे हे कायदा-सुव्यवस्था व सामाजिक प्रश्नांवर जनजागृती करणारे महत्त्वाचे घटक असताना, पत्रकारांनाच बैठकीपासून दूर का ठेवण्यात आले, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, याबाबत आष्टी पोलीस निरीक्षकांकडे विचारणा केली असता, झालेली बैठक ही 'शांतता कमिटीची बैठक नव्हती', असे सांगण्यात आले. तसेच, शांतता कमिटीची नव्याने बांधणी करणे आवश्यक असून, सध्याच्या कमिटीतील अनेक सदस्य वयस्कर झाले आहेत, तर काही सदस्यांचे निधन झाले असल्याचेही त्यांनी सांगितले.

जर संबंधित बैठक शांतता कमिटीची नव्हती, तर गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोजक्याच नागरिकांच्या उपस्थितीत नेमकी कोणती बैठक घेण्यात आली? या बैठकीचा उद्देश काय होता? त्यासाठी कोणाला बोलावण्यात आले आणि कोणाला वगळण्यात आले? याबाबत अधिकृत माहिती नागरिकांसमोर येणे आवश्यक आहे.



लोकनेत्या महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन आणि पर्यावरण मंत्री मा ना पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांनी मुंबई येथील रामटेक निवास्थानी परळी वैजनाथ भाजपा तालुका अध्यक्ष राजेश गित्ते यांना वाढदिवसा निमित्त यथोचित सत्कार करून आशीर्वाद आणि शुभेच्छा दिल्या.

# दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलमध्ये तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा उत्साहात संपन्न




**परळी (प्रतिनिधी)**

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासोबतच क्रीडा कौशल्याला चालना देण्याच्या उद्देशाने दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल, परळी वैजनाथ येथे दि.११ सप्टेंबर रोजी तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने व परळी क्रीडा शिक्षक संघटना यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे उद्घाटन शाळेचे प्राचार्य डॉ.श्रीकांत पाटील सर,मा.श्री. विजय मुंडे सर,मा.श्री. संजय देशमुख सर व मा.श्री. यशवंत कांबळे सर व इतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या स्पर्धेत दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. यामध्ये १४ वर्षे वयोगटातील कु.सेजल सोनवणे, चि.स्पर्श वंजारे तसेच १७ वर्षे वयोगटातील मुलींमध्ये कु.शरयु वंजारे व अक्षरा मुंडे तर मुलांमध्ये चि.सर्वेश वानकर या या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झालौ.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे मार्गदर्शक व प्रेरणास्त्रोत मा.श्री.किरण गित्ते सर (आय.ए.एस.), मुख्यमंत्री सचिव, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, उद्योग व वाणिज्य विभाग, त्रिपुरा सरकार, विवेकानंद यूथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ. उषा किरण गित्ते मॅडम तसेच शाळेचे प्राचार्य डॉ.श्रीकांत पाटील सर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक उपक्रमांसोबतच विविध क्रीडा उपक्रमांना शाळेच्या वतीने सातत्याने प्रोत्साहन दिले जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या विद्यार्थ्यांना शाळेच्या क्रीडा विभागातील कु.संघमित्रा हुमने मॅडम, अपर्णा भाटकर मॅडम आणि भरत सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेतील शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांकडून त्यांचे कौतुक होत असून, जिल्हास्तरीय स्पर्धेतही ते उत्कृष्ट कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# अनिषा ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांचे फुटबॉल, बॅडमिंटन व बुद्धिबळ स्पर्धेत घवघवीत यश

**आष्टी** : अनिषा ग्लोबल स्कूल, आष्टीच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय फुटबॉल, बॅडमिंटन आणि बुद्धिबळ स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत विजेतेपद पटकावले. या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर विजेत्या संघांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

हंबर्डे कॉलेज, आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या १४ वर्षांखालील मुलांच्या तालुकास्तरीय फुटबॉल स्पर्धेत अनिषा ग्लोबल स्कूलच्या संघाने शानदार विजय मिळवत विजेतेपद पटकावले. विजयी संघात अनघ मोहळकर, हर्षवर्धन काळे, कनिफनाथ मिसाळ, शंभू ओव्हाळ, अनुष पवार, प्रसाद साऊणे, साई खुळपे, श्रीराज मुरकुटे, अर्णव नवसरे, अथर्व ओमासे, अथर्व गायकवाड, विश्वजीत जगताप, सोहम संगाळे, अबान शेख, श्रीराम खेंगारे आणि यशराज शिंदे यांचा समावेश आहे.

तसेच कडा ग्रामपंचायत बॅडमिंटन हॉल, कडा येथे झालेल्या तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत अनिषा ग्लोबल स्कूलच्या मुली आणि मुलांच्या संघांनी विजेतेपद मिळविले. विजेत्या मुलींच्या संघात अनुष्का घोडके, स्वरा वराट, अनुष्का कांबळे आणि अनुष्का काळे यांचा समावेश होता. तर विजेत्या मुलांच्या संघात हर्षवर्धन काळे, अनघ मोहळकर, चैतन्य दहिकर, सिद्धार्थ कोठारी आणि शंभू ओव्हाळ यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

पिंपळेश्वर इंग्लिश स्कूल, आष्टी येथे आयोजित तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेतही अनिषा ग्लोबल स्कूलच्या मुली आणि मुलांच्या संघांनी विजेतेपद पटकावले. विजेत्या मुलींच्या संघात पलक चोपडा, अनुष्का कांबळे, अनुष्का काळे आणि तेजस्विनी शिंदे यांचा समावेश होता. तर विजेत्या मुलांच्या संघात अनघ मोहळकर, आदेश पडोळे, मोहम्मद फाज खान, सक्षम टेकाळे आणि विराज पितळे यांनी विजय मिळविला.

या सर्व विजेत्या संघांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विद्यार्थ्यांनी दाखवलेली मेहनत, शिस्त, संघभावना, चिकाटी आणि क्रीडाभावना यामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

विद्यार्थ्यांना क्रीडाशिक्षक श्री. अजीम शेख यांचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल श्री. पिंपळेश्वर महादेव देवस्थानचे अध्यक्ष श्री. सुरेश (अण्णा) धस, शाळेच्या कार्यकारी संचालिका सौ. प्राजक्ता धस, प्राचार्य श्री. अविनाश राऊत व कु. हरजोतकौर जोगी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. जिल्हास्तरावरही विद्यार्थी उत्तम कामगिरी करून अनिषा ग्लोबल स्कूल आणि आष्टीचे नाव उज्ज्वल करतील, असा विश्वास शाळेच्या वतीने व्यक्त करण्यात आला.



# १३ वर्षांनंतर ईस्ट झोनकडे दुलीप ट्रॉफीचे विजेतेपद; इशान किशनच्या ऐतिहासिक द्विशतकासह दमदार कामगिरी

■ चेन्नई : वृत्तसंस्था

दुलीप ट्रॉफी २०२६ च्या अंतिम सामन्यात इशान किशनच्या नेतृत्वाखालील ईस्ट झोन संघाने शानदार कामगिरी करत १३ वर्षांचा दुष्काळ संपवला आहे. अंतिम सामना अनिर्णित राहिला असला, तरी पहिल्या डावातील भक्कम आघाडीच्या आधारावर ईस्ट झोनने तिसऱ्यांदा दुलीप ट्रॉफीवर आपले नाव कोरले.

### इशान किशन आणि फलंदाजांचे वर्चस्व

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेत ईस्ट झोनने आपल्या पहिल्या डावात अफाट फलंदाजी करत ७०८ धावांचा डोंगर उभा केला. सलामीवीर अभिमन्यू ईश्वरन (७२) आणि वैभव सूर्यवंशी (४४) यांनी शतकी भागीदारी करत दमदार सुरुवात करून दिली. तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या शिखर मोहनने ८५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली

कर्णधार इशान किशनने अप्रतिम फलंदाजी करत ३३४ चेंडूंमध्ये ३० चौकार आणि ७ षटकारांच्या मदतीने तब्बल २७० धावांची महाविस्फोटक खेळी केली, मात्र त्याचे त्रिशतक अवघ्या ३० धावांनी हुकले. तसेच कुमार कुशाग्रने १०१ धावांची शतकी खेळी केली. कुशाग्र आणि इशानने पाचव्या विकेटसाठी २३० धावांची जुगलबंदी केली. याशिवाय अनुकूल रॉयने ४५ आणि मोहम्मद कौनाईन कुरेशीने ४० धावांचे योगदान दिले. साऊथ झोनकडून



त्रिपुरन विजयने ४ बळी घेतले साऊथ झोनचा पहिला डाव व तिलक वर्माचे शतक हुकले प्रत्युत्तरात, साऊथ झोनची पहिली सुरुवात अतिशय खराब झाली आणि रिकी भुई केवळ १ धाव काढून बाद झाला. नारायण जगदीसनने ३२, तर देवदत्त पडिक्कलने ६२ धावांची अर्धशतकी खेळी केली. शेख रशीदने २७ धावा केल्या. कर्णधार तिलक वर्माने झुंज दिली, मात्र त्याचे शतक अवघ्या १ धावेने हुकले आणि तो ९९ धावांवर बाद झाला. पहिल्या डावात साऊथ झोनचा संपूर्ण संघ ३३६ धावांवर आटोपला.

### दुसरा डाव आणि सामना अनिर्णित

■ सामन्याच्या पाचव्या आणि अंतिम दिवशी ईस्ट झोनने आपला दुसरा डाव ७ बाद ३८८ धावांवर घोषित केला. दुसऱ्या डावात वैभव (८) आणि अभिमन्यू (३) लवकर बाद झाले, मात्र इशान किशनने ८० आणि शिखर मोहनने ५२ धावांची खेळी केली. तसेच कुमार कुशाग्रने ४६, अनुकुल रॉयने ६४ आणि मोहम्मद कौनाईन कुरेशीने नाबाद ११६ धावांची शतकी खेळी केली. सामना अनिर्णित राहिला असला तरी पहिल्या डावातील मजबूत आघाडीच्या बळावर ईस्ट झोनला विजेता घोषित करण्यात आले.

### वैयक्तिक पुरस्कार

■ संपूर्ण स्पर्धेत दोन्ही डावांत मिळून एकूण ३५० धावा करणाऱ्या कर्णधार इशान किशन याला 'सामनावीर' म्हणून गौरविण्यात आले, तर साऊथ झोनचा कर्णधार तिलक वर्मा याला 'स्पर्धेतील सर्वोत्तम क्रिकेटपटू' (Player of the Series) म्हणून सन्मानित करण्यात आले. ईस्ट झोन संघाने यापूर्वी २०११-१२ आणि २०१२-१३ मध्ये ही स्पर्धा जिंकली होती.

# भारताचा पाकिस्तानवर 19-० असा ऐतिहासिक आणि दणदणीत विजय, उपांत्य फेरीत दिमाखात प्रवेश

■ मोकी (चीन) : वृत्तसंस्था

महिला ज्युनियर आशिया कप २०२६ च्या उपांत्यपूर्व फेरीत भारतीय ज्युनियर महिला हॉकी संघाने पाकिस्तानचा तब्बल १९-० असा पराभव करत संस्मरणीय विजय मिळवला आहे. सामन्याच्या चारही क्वार्टर्समध्ये जबरदस्त आक्रमक खेळ करत भारताने हा एकतर्फी सामना गाजवला आणि स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली.

### पहिल्याच क्वार्टरपासून भारताचे आक्रमक वर्चस्व

सामन्याची सुरुवात झाल्यापासूनच भारताने पाकिस्तानवर पूर्णपणे दबाव कायम ठेवला. जरी सुरुवातीच्या पाच मिनिटांत मिळालेले दोन पेनल्टी कॉर्नर वाया गेले तरी, ७ व्या मिनिटाला पूजा साहूने पेनल्टी कॉर्नरवर गोल करत भारताचे खाते उघडले. पाठोपाठ ९ व्या मिनिटाला रोशनी ऐंदने मैदानावरून गोल करत आघाडी २-०



केली.११ व्या मिनिटाला तनुश्री दिनेश काडूने गोल केला, तर १३ व्या मिनिटाला पाकिस्तानने सर्कलमध्ये फाऊल केल्यामुळे मिळालेल्या पेनल्टी स्ट्रोकवर सुखवीर कौरने सहज गोल नोंदवला. त्यानंतर अवघ्या काही मिनिटांतच सानिका चंद्रकांत मानेने आणखी एक फील्ड गोल करत पहिल्या क्वार्टरच्या अखेरीस भारताला ५-० अशी भक्कम आघाडी मिळवून दिली.

# ब्राझीलच्या २६ सदस्यीय स्टार फुटबॉल संघाची घोषणा, कार्लो अँसेलोटी यांच्याकडे मुख्य प्रशिक्षकपद

■ नवी दिल्ली प्रतिनिधी

पाच वेळा विश्वचषक विजेता असलेला ब्राझीलचा फुटबॉल संघ ३ ऑक्टोबर २०२६ रोजी कोलकाता येथील विवेकानंद युवा भारती क्रीडांगणावर भारताविरुद्ध होणाऱ्या ऐतिहासिक मैत्रीपूर्ण सामन्यासाठी सज्ज झाला आहे. या सामन्यासाठी ब्राझीलचे मुख्य प्रशिक्षक कार्लो अँसेलोटी यांनी २६ सदस्यीय अत्यंत मजबूत आणि ताकदवान संघाची घोषणा केली आहे. विशेष म्हणजे, वरिष्ठ ब्राझिलियन पुरुष संघाचा भारतीय भूमीवरील हा पहिलाच आंतरराष्ट्रीय सामना असणार आहे.( Friendly match against India)

### ऑस्ट्रेलियन दौऱ्यानंतर भारत दौरा

भारतात येण्यापूर्वी ब्राझीलचा संघ २५ आणि २९ सप्टेंबर रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध दोन मैत्रीपूर्ण सामने खेळेल. त्यानंतर संघ कोलकाता येथे दाखल होईल, जिथे ३ ऑक्टोबर रोजी भारतीय संघाशी त्यांची गाठ पडेल. खालिद जमील यांच्या नेतृत्वाखालील भारतीय संघासाठी जागतिक स्तरावरील सर्वात यशस्वी संघांपैकी एकाविरुद्ध स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची ही सुवर्णसंधी ठरणार आहे.

### संघात स्टार खेळाडूंचा भरणा


प्रशिक्षक अँसेलोटी यांनी संघात दिग्गज खेळाडूंना स्थान दिले असून, यात बॅलोन डी'ओरसाठी नामांकित तीन फुटबॉलपटूंचाही समावेश आहे. आक्रमक फळीत विनिसियस ज्युनियर, राफिन्हा, अँड्रिक यांच्यासह एस्तेवाओ, जोआओ पेड्रो, पेड्रो, रायन आणि सॅम्युअल लिनो यांचा समावेश करण्यात आला आहे.



# 'माझं वय 90 झालं तरी ती गोष्ट मी नाही सोडणार'; इशान किशन

■ मुंबई : प्रतिनिधी

दुलीप ट्रॉफी फायनल सामना अनिर्णित राहिला आणि पहिल्या डावाच्या आघाडीवर ईस्ट झोन संघ विजयी ठरला. या सामन्यात ईस्ट झोनच्या संघाचे वर्चस्व पाहायला मिळाले. ईस्ट झोन संघाने पहिल्या डावात ७०८ धावांचा डोंगर उभा केला होता. या लक्ष्याचा पाठलाग करताना साऊथ झोन संघाचा डावा ३३६ धावांवर आटोपला. इशान किशन याने या सामन्यात केलेली २७० धावांची द्विशतकी खेळी महत्त्वाची ठरली. कारण एकट्यानेच पहिल्याच डावातील जवळपास ५० टक्के धावा केल्या होत्या. त्यानंतर दुसऱ्या डावातही आपली बॅटिंग सुरू ठेवली होती, पाचव्या दिवशी सामना रद्द झाला पण त्यांनी डाव काही घोषित केला नाही. कारण नियमानुसार पहिल्या डावातील आघाडीमुळे सामना खिशात घातला होता. सामना संपल्यावर इशान किशन आनंदी दिसला आणि प्रतिक्रिया देताना काय



म्हणाला जाणून घ्या.

### इशान किशन काय म्हणाला?

एक संघ म्हणून आम्ही हे विजेतेपद मिळवलं आहे. मला वाटतं की प्रत्येकजण एकमेकांची काळजी घेत होता आणि माझ्यासाठी हीच सर्वात महत्त्वाची गोष्ट होती. मला वाटतं की मी एक चांगला लीडर ठरलो आहे. पण हो, ही वाटचाल इथेच संपत नाही. प्रत्येक विभागात सतत सुधारणा करत राहणं गरजेचं आहे. क्षेत्ररक्षण असो किंवा इतर कोणताही विभाग, चुका होतच असतात. त्यामुळे त्या चुका सुधारून दिवसेंदिवस अधिक चांगलं होण्यावर आपला भर असायला हवा, असं इशान किशन म्हणाला.

# आशिया कपमध्ये भारत वि. बांगलादेश, फायनल कोण गाठणार

■ मुंबई : प्रतिनिधी

आशिया कप महिला टी-२०क्रि केट स्पर्धेतील पहिला सेमी फायनल सामना भारत आणि बांगलादेशमध्ये पाक पडणार आहे. गेल्या वर्षभरापासून भारत आणि बांगलादेश यांच्यातील राजकीय संबंधही तणावाचे झाल्याने सामन्याचा निकाल प्रतिस्पर्ध्यांसाठी मानापमानाप्रमाणेही ठरू शकतो. फॉर्मात असलेल्या भारताचे पारडे जड असले तरी, हरमनप्रीत आणि कंपनीवर दडपण असण्याची शक्यताही आहे. हा सामना किती वाजता आणि कुठे पाहता येणार जाणून घ्या.

### भारत वि. बांगलादेश सामना किती वाजता?

भारत वि. बांगलादेशमधील सामना दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियम, दुबई येथे पडणार आहे. या सामन्याचे प्रक्षेपण रात्री ८ वाजता सोनी स्पोर्टस आणि जिओ हॉटस्टारवर असणार आहे. आतापर्यंत भारत आणि बांगलादेश हेड टू हेडमध्ये भारताने २१ आणि बांगलादेशने तीन विजय मिळवले आहेत. खेळपट्टीचा अंदाज पाहता आशिया कपमध्ये फलंदाजांना धावांसाठी



संघर्ष करावा लागत आहे. हाँगकाँगविरुद्धच्या सामन्यात भारताने केलेल्या १६० धावा या यंदाच्या सर्वोच्च धावा ठरल्या. प्रतिस्पर्ध्यांच्या फिरकी गोलंदाजांचे वर्चस्व बघायला मिळण्याचा अंदाज आहे. गेल्या पाच सामन्यांत भारताचे ४ विजय तर १ पराभव आणि बांगलादेशाचे ३ पराभव आणि २ विजय मिळवले आहेत.

# तिसऱ्या कसोटीत दीड तासातच पाकिस्तानचा खेळखंडोबा, कॅप्टन बाबर 24 तासात पडला उघडा; इंग्लंडने उडवली दाणादाण

■ मुंबई : प्रतिनिधी

इंग्लंड आणि पाकिस्तानमधील तिसऱ्या आणि शेवटच्या कसोटीला सुरूवात झाली आहे. या मालिकेमधील सुरूवातीच्या दोन कसोटी सामन्यात पाकिस्तानवर मोठे विजय मिळवले होते. सर्वात जास्त चर्च झाली ती म्हणजे पीसीबीने (पाकिस्तान क्रिकेट बोर्ड) सात खेळाडूंना माघारी बोलवण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर आजच्या सामन्यामध्ये तीन जणांचे पदार्पण करण्यात आले होते. पण याचा काही फायदा झाला नाही, कारण पाकिस्तानचा संघ अवघ्या १३३ धावांवर ऑल आऊट झालाय. पाकिस्तानच्या ८ खेळाडूंना दुहेरी धावसंख्या गाठता आली नाही. सर्वात जास्त तोंडावर पडला तो म्हणजे कॅप्टन बाबर आझम. कारण पठ्ठ्याने पत्रकार परिषदेमध्ये छाती फुगवून आपल्या रेकॉर्डचा संदर्भ दिलेला त्याला २४ तासही उलटले नाहीत अन् गडी मैदानात मात्र अपयशी ठरला.

बाबर आझम याने सामन्याच्या एक दिवस आधी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये त्याला कठीण प्रश्नांमा सामोरं जावं लागलं. मोहम्मद रिझवान आणि सलमान अली आगा यांना खराब प्रदर्शनामुळे बाहेर केलं असेल तर तुझं काय? हा प्रश्न ऐकताच तो भडकला आणि त्याने उत्तर देताना वेस्ट इंडिजविरूद्धच्या कामगिरीचा संदर्भ दिला.वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेत आपण मालिकावीर ठरलो होतो, असे सांगत त्याने आपली बाजू मांडली होती. पण गडी पहिल्या डावात अवघ्या ७ धावांवर बोल्ड झाला. सामन्याच्या एक दिवस आधी केलेली पोपटपंची हवेतच गेली.



# " उटी गाव इथे मुक्या प्राण्यांच्याही संवेदना जपल्या जातात...!"

## स्व.जयवंतराव गावंडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्था उटी यांचा गेल्या तेरा वर्षापासून असाही उपक्रम

## उटी येथे तान्या पोळ्यानिमित्त उत्कृष्ट बैलजोडी पुरस्कार उत्साहात संपन्न

**महागाव** | स्व.जयवंतराव गावंडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्था उटी यांची तेरा(13) वर्षांपासूनची सांस्कृतिक परंपरा कायम ठेवून पोळा या सणाचे औचित्य साधून उत्कृष्ट बैलजोडी पुरस्कार संत गजानन महाराज संस्थान उटी येथे आयोजन करण्यात आले होते प्रसंगी उत्कृष्ट प्रथम ,द्वितीय व तृतीय बैलजोडीला पुरस्कार प्रदान करण्यात आला.मुक्या प्राण्यांच्याही संवेदना जपल्या जातात ,असे कार्यक्रमाच्या आयोजनातुन दिसून आले.

भारत हा कृषीप्रधान देश आहे,त्यामुळे "शेतकरी जगला तर देश सुखी व समृद्ध होईल" या उदात्त भावनेतून शेतकऱ्यांसाठी काहीतरी वेगळे करण्याच्या हेतूने दरवर्षी पोळा या दिनी बळीराजासोबत एकनिष्ठ असलेला सर्जा -राजा कष्ट करून बळीराजाला समृद्ध व सधन करतो. या हेतूने मुक्या सहकार्याची निगा करणाऱ्या बळीराजाचा सन्मान व सत्कार शाल, टोपी, श्रीफळ,सन्मानपत्र, संस्थेचे टी-शर्ट, रोख रक्कम फुलगुच्छ देऊन करण्यात आला.

यावर्षी उत्कृष्ट बैलजोडी म्हणून प्रथम क्रमांक येण्याचा मान संतोष जनार्दन जाधव यांच्या बैलजोडीने पटकाविला .दुसरा क्रमांक येण्याचा मान शेतकरी भीमराव किसन मोरे यांच्या बैलजोडीने पटकावला,तर तृतीय क्रमांक हा समाधान गणेश गावंडे यांच्या बैलजोडीने फटकावला, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत निळकंठराव गावंडे, विलास वानखेडे, बंडूजी ठाकरे, सुरेश वानखेडे, प्रमोद गावंडे, देविदास वानखेडे, मा. मुख्याध्यापक दिगंबर वानखेडे ,संत गजानन महाराज संस्थानचे अध्यक्ष मा.प्राचार्य मारोतराव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आला





उत्कृष्ट बैलजोडी निवड समिती पर्यवेक्षक म्हणून जयवंतराव वानखेडे , गणेश कोंडबा गावंडे , बंडूजी रामराव वानखेडे पंडित माहुलकर,यांनी उत्कृष्टरित्या काम पाहीले.

शैक्षणिक उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल जिल्हा परिषद पालघर येथे निवड झालेले विश्वकर्मा पंडित माहुलकर, तसेच फार्मासिटिकल कंपनीमध्ये मलेशिया येथे पुरस्कार प्राप्त भागवत प्रभाकर वानखेडे यांचा शाल श्रीफळ सन्मानपत्र संस्थेचे टी-शर्ट देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या गणेश वानखेडे सूत्रसंचालन मा. मुख्याध्यापक दिगांबर वानखेडे सर, सर यांनी केले आभार प्रदर्शन मा. प्राचार्य मारोतराव ठाकरे सर.

## (जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन विशेष – 10 सप्टेंबर 2026)

# उत्साह आणि आनंदाने जगण्याची कला शिका

जीवनाचे मोल केवळ एका गोष्टीवरून समजून घ्या की, एखादे मृत शरीर आहे; जगातील सर्व संपत्ती खर्च करून, अत्याधुनिक रुग्णालये, सरकारे, धार्मिक कर्मकांड या सर्वांनी मिळून प्रयत्न केले, संपूर्ण ब्रह्मांडाची ताकद पणाला लावली, तरी मृत शरीरात एका सेकंदासाठीही प्राण आणता येत नाहीत. म्हणजेच जीवन अनमोल आहे. ते संपविण्याचा अधिकार आपल्याला स्वतःला पण नाही, कारण हे जीवन पालकांची देन आहे. दरवर्षी १० सप्टेंबर रोजी "विश्व आत्महत्या प्रतिबंध दिवस" जगभरात जनजागृतीसाठी साजरा केला जातो. लोकांच्या मनातील आत्महत्येसारखे वाईट विचार दूर करून सुखद आणि सकारात्मक विचारांचे वातावरण निर्माण करण्यावर भर देणे हा त्याचा उद्देश आहे. "आत्महत्येबद्दलचा विचार बदलूया आणि संवादाची सुरुवात करूया" ही त्याची संकल्पना असून, २०२४ ते २०२६ या कालावधीसाठी हीच संकल्पना ठेवण्यात आली आहे.

आजच्या आधुनिक युगात आत्महत्यांच्या घटनांमध्ये झालेली मोठी वाढ आपल्याला संकेत देत आहे की, आपण अनुचित वातावरणात वावरतोय. आत्महत्येची कारणे जसे की – मानसिक आरोग्याच्या समस्या, मानसिक खेळांचे बळी ठरणे, एकटेपणा आणि कमकुवत होत चाललेले सामाजिक संबंध, अपयश, शिक्षण आणि करिअरचा दबाव, आर्थिक असुरक्षितता, फसवणूक, भीती, नातेसंबंध तुटणे, सामाजिक तुलना आणि डिजिटल दबाव, हिंसा, गैरवर्तन आणि भेदभाव, मादक पदार्थांचे सेवन किंवा वाईट व्यसन, खोटे देखावे करण्याची सवय, शरीरात किंवा मनात दीर्घकाळ राहणाऱ्या वेदना आणि आजार. अशा अनेक कारणांमुळे आत्महत्यांमध्ये सातत्याने वाढ झाली आहे. यात लवकरच सुधारणा करणे आवश्यक आहे.

जेव्हा आत्महत्या होते, तेव्हा केवळ एका व्यक्तीचा जीव जात नाही, तर त्या कुटुंबात, नातेवाईकांमध्ये, कार्यस्थळी, समाजात आणि संबंधित संपूर्ण समुदायामध्ये कायमस्वरूपी एक जागा रिकामी होते; तसेच सामाजिक, भावनिक आणि आर्थिक परिणाम होतात. आत्महत्या रोखण्यासाठी परस्पर संबंधांमध्ये सहानुभूतीपूर्वक संवादाला प्रोत्साहन देणे अत्यंत गरजेचे आहे. गैरसमज दूर करणे, समस्या सांगणे, मोकळेपणाने आपले म्हणणे मांडणे, सहानुभूती आणि सहकार्याचे वातावरण निर्माण करणे, या गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत. सरकार आणि सामाजिक संस्थांनीही समाजात आनंददायक, सकारात्मक वातावरण टिकवून ठेवण्यासाठी अमूल्य भूमिका बजावली पाहिजे.

ज्या देशात किंवा समाजात अधिक समस्या आणि अडचणी असतात, तेथील वातावरणात राहणारे लोक अधिक आत्महत्या आणि गुन्हे करतात, कारण जगण्यासाठी अधिक संघर्षाचा सामना करावा लागतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानसिक आरोग्य ॲटलस २०२४ अहवालानुसार, वर्ष २०२१ मध्ये आत्महत्येमुळे ७,२७,००० मृत्यू झाले. तरुणांमध्ये मृत्यूचे तिसरे सर्वात मोठे कारण आत्महत्या हेच आहे. जागतिक स्तराच्या तुलनेत भारतात आत्महत्यांचे प्रमाण अधिक आहे. महाराष्ट्रातील शेतकरी वर्गाच्या आत्महत्या हा सर्वाधिक चिंतेचा विषय आहे. महाराष्ट्र सरकारच्या आकडेवारीनुसार, राज्यात वर्ष २०२३ मध्ये एकूण ६,६६९ शेतकरी आणि शेतमजुरांनी आत्महत्या केली, तर संपूर्ण भारतात १०,७८६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली होती.

अनेक वेळा आपल्याला माहीत असते की, एखादी गोष्ट आपल्यासाठी नुकसानकारक आहे, तरीही आपण सुधारत नाही. पुष्कळदा छोट्या-छोट्या निरुपयोगी गोष्टींना अधिक महत्त्व दिले जाते, ज्याचा थेट वाईट परिणाम आपल्या आरोग्यावर होतो. आजकाल स्वतःला दुःख देण्यासाठी आपण स्वतःच अधिक जबाबदार आहोत. लवकर राग येणे, मनासारखे काम न झाल्यास आपला संयम गमावणे, इतरांना दोष देणे किंवा द्वेष करणे, इतरांवर आंधळा विश्वास ठेवणे, भावनांच्या भरात वाहून जाणे, स्वार्थ, लोभ, खोटा देखावा करणे आणि प्रतिकूल परिस्थितीतही तो देखावा कायम ठेवणे, समाधानाचा अभाव, सतत जीवनाच्या स्पर्धेत धावत राहणे, वाईट संगत, इतरांच्या आनंदात दुःखी होणे आणि दुःखात आनंदी होणे, मत्सर, लोकांकडून जास्त अपेक्षा ठेवणे, परावलंबी असणे, मानसिक खेळांचे बळी ठरणे, मेहनतीपासून दूर पळणे आणि शॉर्टकटचा अवलंब करणे अशा अनेक गोष्टी माणसाने स्वतःच निर्माण केलेल्या आहेत. माणूस इच्छित असल्यास या गोष्टींवर नियंत्रण ठेवून अधिक चांगले, आरोग्यदायी आणि समाधानी जीवन जगता येऊ शकते. आपल्या चुकांचे परिणामच अनेकदा आपल्याला आत्महत्येच्या विचारांपर्यंत घेऊन जातात. त्यामुळे असे काम किंवा वर्तन करावे, ज्यामुळे आपण अडचणी आणि चुकांपासून दूर राहू शकू.

इतरांवर लगेच विश्वास ठेवू नका, कोणावरही आंधळा विश्वास ठेवू नका. परिस्थितीनुसार आपल्या कामात परिवर्तनशीलता आणा, कौशल्ये शिका. गडद मनोवैज्ञानिक खेळ खेळणाऱ्या लोकांपासून दूर राहा. खोट्या देखाव्यापासून दूर राहा, व्यसनांपासून दूर राहा, वाईट संगत करू नका. पश्चात्ताप करण्यात वेळ वाया घालवू नका; आता काय चांगले करता येईल, याचा विचार करा. चांगल्या लोकांच्या संपर्कात राहा, जे प्रतिकूल परिस्थितीतही तुमची साथ देतील. आधुनिकता आणि सोशल मीडियाचे व्यसन लागू देऊ नका. कोणताही निर्णय घेण्यापूर्वी विचार करा, परिणामांचा अंदाज घ्या आणि त्यानंतर कृती करा. तीव्र राग, भावना किंवा जोशाच्या भरात अनुचित निर्णय घेण्यापासून दूर राहा. आधुनिक जीवनशैली मानवी जीवनासाठी शाप ठरत आहे, तिचे अंधानुकरण करू नका. समाधानी राहा, मेहनतीवर विश्वास ठेवा, आपल्या इच्छा इतरांवर लादू नका, दररोज



स्वतःसाठी वेळ काढा, आरोग्यदायी छंदांना प्राधान्य द्या.

शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या तंदुरुस्तीसाठी दररोज व्यायाम करा. निसर्ग, पर्यावरण, पशू-पक्ष्यांचे संरक्षण आणि परोपकाराची भावना जागृत करा, असहाय्यांना मदत करा. आयुष्य नवचैतन्याने जगायचे आहे, केवळ वेळ घालवायचा नाही आहे. चारित्र्य जपा, आपल्या माणसांच्या प्रेमाची, भावनांची कदर करा आणि आपल्या अनमोल जीवनाचे मोल समजून घ्या. आपल्या कृतीमुळे कधीही कोणाला त्रास होऊ नये, अशा जीवनाचा निर्धार करा. जर आपण अनुचित काम करत नसू, तर लोक काय म्हणतील याचा विचार करू नका. कोणतेही काम छोटे-मोठे नसते. इतरांच्या आनंदात आनंदी होणे आणि इतरांच्या दुःखात त्यांच्या वेदना वाटून घेणे हीच माणुसकी आहे, हेच मानवाचे कर्तव्य आहे. अशा सवयी आणि वातावरणात जगणारी व्यक्ती नेहमी सकारात्मक ऊर्जेने ओतप्रोत असते, ती त्रास आणि अडचणींपासून पळून जात नाही, तर त्यांचा ठामपणे सामना करते. ती नेहमी शांत, सजग, समाधानी आणि प्रसन्न राहते आणि आपल्यालाही असेच जगायचे आहे.

लुई ब्रेल, अब्राहम लिंकन, फ्लोरेन्स नाइटिंगेल, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, थॉमस एडिसन, अलेक्झांडर ग्रॅहम बेल, मेरी क्युरी, डॉ. बी. आर. आंबेडकर, श्रीनिवास रामानुजन, चार्ली चॅप्लिन, नेल्सन मंडेला, मदर तेरेसा, ए. पी. जे. अब्दुल कलाम, दशरथ मांझी, बचेंद्री पाल, सिंधुताई सपकाळ, अरुणिमा सिन्हा, मलाला युसुफझाई, निक वुजिसिक, तुळशी गौडा, सोनम वांगचुक, मेरी कोम यांसारखे असंख्य लोक होऊन गेले आणि आजही आहेत, ज्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून संघर्षमय जीवनाला एक आदर्श बनविले आणि जगात मार्गदर्शक म्हणून प्रकाशमान झाले.

तणावामुळे हृदयविकाराचा झटका, पक्षाघात किंवा इतर गंभीर आजारांच्या समस्या वेगाने वाढत आहेत. कोणत्याही समस्येचा ताण घेऊ नका. तणाव व्यवस्थापनाची कला आपण आपल्या देशातील नेत्यांकडून शिकली पाहिजे. अतिसामान्य ग्रामीण व्यक्ती, साधारण कद-काठीचा, जवळजवळ अशिक्षित गरीब मजूर दशरथ मांझी यांनी कोणाच्याही मदतीशिवाय २२ वर्षांच्या अथक परिश्रमातून एकट्याने डोंगर कापून लोकांच्या सोयीसाठी रस्ता तयार केला. एवढ्या अडचणींमध्ये त्यांनी इतिहास घडविला, तर आपण आयुष्यात एवढ्या लवकर का हार स्वीकारायची? यश मिळेपर्यंत प्रयत्न सुरू ठेवा. आपल्या कामात छोटीशी मुंगीही कधी हार मानत नाही; मग आपण तर माणूस आहोत. आपला निर्धार आणि धैर्य बुलंद असेल तर आपणही नक्कीच जिंकू. अडचणी, अपयश किंवा दुःख आले, किंवा कधीही वाईट विचार त्रास देऊ लागले, तर एक गोष्ट लक्षात ठेवा की, जगात आपल्यापेक्षाही अधिक वाईट परिस्थितीत लोक जगत आहेत आणि वेळ थांबत नाही. काळ बदलतोच; आपलाही काळ बदलेल नक्कीच.

**लेखक – डॉ. प्रितम भि. गेडाम**
**(महाराष्ट्र शासनाद्वारे पुरस्कृत लेखक**



पोळ्या निमित्त कन्हैया नरवाडे यांनी बैलांची पूजन करून निसर्गाला साकडे घातले दुष्काळाचे सावट बळीराजापासून कोसो दूर जाऊन बळीराजाच्या धन धान्याला भरभराटी येऊन बळीराजाच्या घरी सुख समृद्धी नांदल्या जाओ.

# साजापूरमध्ये महावितरणच्या उपकेंद्र कामात अडथळा:महिला अभियंत्याला धमकी, कलीम पठाणसह 5 जणांवर वाळूज MIDC पोलिसांत गुन्हा दाखल

**छत्रपती संभाजीनगर** | छत्रपती संभाजीनगर येथील साजापूर सुरू असलेल्या महावितरणच्या विद्युत उपकेंद्राच्या कामात वारंवार अडथळे आणून महिला अभियंता व ठेकेदारास धमकावल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी कलीम चाँद पठाण व त्याच्यासोबतच्या चार ते पाच इसमांवर वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुरुवारी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला.

साजापूर येथील गट नं.44 मध्ये शासनाच्या महत्त्वाकांक्षी एमएसकेव्हीवाय-2.0 (मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना) अंतर्गत नवीन 33 केव्ही उपकेंद्राचे काम सुरू आहे. सदर जमीन शासनाने महावितरण कंपनीस वाटप केलेली असून, जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार त्या ठिकाणी उपकेंद्राचे बांधकाम सुरू आहे. मात्र या कामास काही स्थानिक व्यक्तींकडून सातत्याने विरोध होत असल्याने 20 एप्रिल 2026 रोजी वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात पोलिस उपायुक्तांच्या उपस्थितीत उपसरपंच, जि.प. सदस्य, स्थानिक नागरिक, महावितरण अधिकारी, नायब तहसीलदार, तलाठी व भूमी अभिलेख कर्मचारी यांची संयुक्त बैठक घेण्यात आली होती.

या बैठकीत संबंधितांना नियमानुसार महावितरणला विनाअडथळा काम करू देण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले होते. अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल असेही सूचित करण्यात आले होते. त्यानुसार 23 एप्रिल 2026 पासून पोलिस संरक्षणामध्ये काम पुन्हा सुरू करण्यात आले.




तथापि, 13 मे 2026 रोजी कलीम चाँद पठाण (खान) याच्यासोबत काही इसमांनी कामाच्या ठिकाणी येऊन 'तुम्ही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून काम बंद ठेवण्याचा आदेश येईपर्यंत काम बंद ठेवा', असे एजन्सीचे सुपरवायजर अमित कुमार यांना धमकावून सांगितले. यानंतर 19 मे 2026 रोजी रात्रीच्या अंधारात कलीम चाँद पठाण व त्याच्या सोबतच्या लोकांनी उपकेंद्रांच्या कंपाउंडच्या बांधकामाची जाणीवपूर्वक तोडफोड करत नुकसान केले. तसेच पूर्वी केलेले उत्खनन माती टाकून बुजवून टाकले. या कृत्यामुळे महावितरणचे एकूण अंदाजे साडेतीन लाख रुपये इतक्या शासकीय मालमत्तेचे नुकसान झाले. ही मंडळी शासकीय कामात वेळोवेळी जाणीवपूर्वक अडथळा निर्माण करून काम बंद पाडत आहेत. सदर घटनेबाबत महावितरणतर्फे 20 मे 2026 रोजी पोलिस ठाण्यात लेखी तक्रार देण्यात आलेली होती.

त्यानंतर 3 सप्टेंबर 2026 पासून महावितरणचे एजन्सीमार्फत काम सुरू झाले. 9 सप्टेंबर 2026 रोजी दुपारी साडेबारा वाजता महावितरणच्या ग्रामीण-1 विभाग कार्यालयातील सहायक अभियंता (पायाभूत आराखडा) चैताली जगदाळे यांच्यासह एजन्सीचे अमितकुमार सिंग, गणेश दाभाडे, मनीष गुंठा, महावितरणचे जनमित्र उद्धव शेळके, महेश कराळे हे हजर असताना कलीम चाँद पठाण व त्याच्यासोबतचे इसम हे गट नं.44 साजापूर मैदान येथे आले. त्यांनी उपकेंद्राच्या कामकाजात अडथळा निर्माण केला. 'तुम्ही येथे कामकाज करायचे नाही', असे पठाण याने सहायक अभियंता जगदाळे यांना धमकावले. नंतर एजन्सीच्या कर्मचाऱ्यांच्या अंगावर धावून जात कंपनीचे कामकाज बंद पाडले. 'तू येथे कसे काय काम करतो तेच बघतो. पोलिस संरक्षणात जरी काम केले तरी तुला बघून घेऊ', असे म्हणत पठाणने ठेकेदाराला मारहाणीची धमकी दिली.

या प्रकरणी सहायक अभियंता चैताली जगदाळे यांच्या फिर्यादीवरून आरोपी कलीम चाँद पठाण व त्याच्यासोबतच्या चार ते पाच इसमांवर वाळूज पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुरुवारी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला.

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड, शनिवार, 12 सप्टेंबर 2026






# रामेश्वर येथे कराड परिवाराच्या वतीने पारंपरिक पद्धतीने बैलपोळा उत्साहात

लातूर | लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर (रूई) येथे कराड परिवाराच्या वतीने शेतकरी बांधवांचा जिव्हाळ्याचा आणि कृतज्ञतेचा सण असलेला बैलपोळा मोठ्या उत्साहाच्या वातावरणात पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. वाजत-गाजत भव्य मिरवणूक गावातून काढण्यात आली. मिरवणुकीत वाद्यांच्या गजराने आणि उत्साहपूर्ण वातावरणाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

बैलपोळा हा केवळ सण नसून शेतकरी आणि त्याच्या पशुधनातील जिव्हाळ्याचे नाते जपणारी महाराष्ट्राची समृद्ध कृषीपरंपरा आहे. वर्षभर शेतकऱ्याच्या शेतीकामात साथ देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस असल्याने कराड परिवाराच्या वतीने हा सण पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला.

बैलपोळ्यानिमित्त बैलांना स्वच्छ धुऊन त्यांना रंगीबेरंगी सजावट करण्यात आली. त्यांच्या शिंगांना आकर्षक रंग लावून विविध प्रकारची सजावट करण्यात आली होती. गळ्यात घुंगरू, अंगावर झूल तसेच फुलांच्या माळांनी बैलांना सजविण्यात आले. सजविलेल्या बैलांची वाजत-गाजत भव्य मिरवणूक गावातून काढण्यात आली. मिरवणुकीत वाद्यांच्या गजराने आणि उत्साहपूर्ण वातावरणाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. मिरवणुकीनंतर कराड परिवाराच्या वतीने बैलांचे विधिवत लग्न लावण्यात आले. त्यानंतर बैलांची आरती करून त्यांना पुरणपोळीचा नैवेद्य खाऊ घालण्यात आला. शेतकऱ्यांच्या जीवनात बैलांचे असलेले महत्त्व आणि शेतीच्या कामात त्यांचे योगदान याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमाला कराड परिवारातील ज्येष्ठ मार्गदर्शक तुळशीरामअण्णा कराड, प्रगतशील शेतकरी काशीरामनाना कराड, डॉ. हनुमंतराव कराड, श्री संत गोपाळ बुवा महाराज साखर कारखान्याचे चेअरमन राजेश कराड, युवा नेते ऋषिकेशदादा कराड, पृथ्वीराज कराड, रणवीर कराड यांच्यासह परिवारातील ज्येष्ठ, महिला, युवक तसेच बालकांनीही उत्साहाने सहभाग घेतला. पारंपरिक संस्कृती आणि ग्रामीण जीवनाशी असलेली नाळ जपण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. बैलपोळ्याच्या निमित्ताने रामेश्वर गावात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.



## अंबाजोगाई जिल्हा निर्मिती व दुष्काळमुक्तीसाठी नदीजोड आवश्यक - ॲड. शिवाजी कांबळे

**अंबाजोगाई** | अंबाजोगाईच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र अंबाजोगाई जिल्हा निर्मिती करणे ही काळाची गरज असून, धनेगाव मांजरा धरणाच्या डाव्या कालव्यातून अंबाजोगाई तालुक्यातील नद्या एकमेकांना जोडून त्यांचे खोलीकरण व रुंदीकरण करणे अत्यावश्यक आहे. जेणेकरून दुष्काळ परिस्थितीत नागरिकांना चारा, पाणी व अन्नाचा तुटवडा भासणार नाही, असे प्रतिपादन समाजवादी पार्टीचे चर्मकार सेल प्रदेशाध्यक्ष ॲड. शिवाजी कांबळे यांनी केले.



१७ कलमी मागण्या -

१) स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय रुग्णालयात तज्ञ डॉक्टरांची नेमणूक व साधनसामुग्री उपलब्ध करून स्वच्छता ठेवणे.

२) बुटेनाथ तलावाची निर्मिती करणे.

३) काळवटी धरणाची उंची वाढवणे.

४) नवीन एम.आय.डी.सी. उभा करून रोजगार निर्मिती करणे.

५) शैक्षणिक हब अंबाजोगाई येथे उभा करणे.

६) नवीन बाजार समिती उभी करून शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव व सेंद्रिय शेतीच्या मालासाठी वेगळा भाव देणे.

७) घाटनांदूर ते अंबाजोगाई रेल्वे मार्ग निर्माण करणे.

८) बुटेनाथ भागात हजारो एकर जमीन असून त्या ठिकाणी विमानतळ उभा करणे.

९) बुद्धीनाथ भागात दूध संकलन केंद्र उभा करणे.

१०) बुटेनाथ भागात पर्यटनासाठी उद्यान निर्मिती करणे.

११) डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे उपकेंद्राची इमारत उभी करणे.

१२) अंबाजोगाई शहरात नगर परिषदेचे सांस्कृतिक सभागृह निर्माण करणे. १३) महिला सक्षमीकरणासाठी बचत गटाच्या वस्तू विक्रीसाठी नगर परिषदेअंतर्गत इमारत उभी करणे.

१४) खंड औद्योगिक संस्था, अंबाजोगाई कार्यालय व पंचायत समिती अंबाजोगाई या संस्थांवर प्रशासक नेमण्यात आले आहेत, त्या पूर्वपदावर आणून लोकांच्या हाताला काम व कर्ज वितरीत करणे.

१५) केज मतदार संघातील बंद पडत असलेल्या जि.प. शाळा जिवंत ठेवणे.

१६) केज मतदार संघात बंद पडलेले कारखाने, सुतगिरण्या चालू करून ऊस व कापसाला हमीभाव मिळवून देणे.

१७) अंबाजोगाई, केज व नेकनूर भागात चांगल्या दर्जाचे गार्डन व सांस्कृतिक भवन उभारणे.

- ॲड. शिवाजी कांबळे

प्रदेशाध्यक्ष, चर्मकार सेल, समाजवादी पार्टी, महाराष्ट्र

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची राज्यकार्यकारिणी बैठक अंबाजोगाईत

### प्रा. डॉ. काशिलिंग गावडे यांचे 12 सप्टेंबर रोजी व्याख्यान

**अंबाजोगाई प्रतिनिधी :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची राज्यकार्यकारिणी बैठक दि. १२ व १३ सप्टेंबर रोजी मानवलोक, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आली आहे. या राज्यस्तरीय बैठकीसाठी महाराष्ट्रातील सुमारे ३० जिल्ह्यांमधून १०० ते १५० कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

या बैठकीस समितीची कार्यकारी समिती, विविध जिल्ह्यांचे कार्याध्यक्ष व प्रधान सचिव तसेच समितीच्या २४ विभागांचे कार्यवाह व सहकार्यवाह सहभागी होणार आहेत. बैठकीमध्ये मागील तीन महिन्यांतील समितीच्या कार्याचा आढावा घेण्याबरोबरच आगामी काळातील कामाचे नियोजन, विविध उपक्रम आणि संघटनात्मक बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.

दरम्यान, या राज्यस्तरीय बैठकीच्या निमित्ताने शनिवार, दि. १२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता सांगली येथील लेखक व इतिहास संशोधक प्रा. डॉ. काशिलिंग गावडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. अंधश्रद्धा निर्मूलन, विवेकवादी विचार आणि इतिहासाच्या अभ्यासाच्या दृष्टीने हे व्याख्यान महत्त्वपूर्ण ठरणार असून, अंबाजोगाई शहरातील नागरिकांसाठी ही बौद्धिक पर्वणी ठरणार आहे. नागरिकांनी या व्याख्यानाचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन महाअंनिस बीड जिल्ह्याच्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्याध्यक्ष माधव बावगे, कार्याध्यक्ष संजय बनसोडे, सर्व विभागांचे प्रधान सचिव तसेच राज्य सरचिटणीस यांची उपस्थिती राहणार आहे.

## 35 वर्षीय तरुण बेपत्ता:पळवून नेल्याचा पत्नीने केला आरोप

**अंबाजोगाई** | दूध आणण्यासाठी घराबाहेर गेलेले पती परत आलेच नाहीत. फोन बंद आहे, दुकानातही नाहीत, अशी तक्रार पत्नीने अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दिली आहे. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

अश्विनी अतुल वाकडे (२६ वर्षे, रा. बर्दापूर ता. अंबाजोगाई, ह.मु. नागझरी परिसर, अंबाजोगाई) यांनी त्यांचे पती अतुल गोविंद वाकडे ( ३५ ) हे रिंगरोड येथील सोनवणे यांचे वेल्डींग वर्क शॉपवर काम करत होते. ८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास त्यांचे पती घरीच होते. ते दूध आणण्यासाठी बाहेर गेले, दूध घेऊन घरी आले, पत्नीला दूध दिले आणि त्यांची शाईन मोटरसायकल घेऊन पुन्हा बाहेर गेले.रात्री ९ वाजले तरी पती घरी आले नाहीत. म्हणून पत्नीने फोन लावला, असता फोन बंद येत होता. त्या वेल्डींगच्या दुकानात जाऊन शोध घेतला असता दुकान बंद होते व पती तेथे नव्हते. गल्लीतील लोकांकडे व नातेवाईकांकडे चौकशी केली असता ते मिळून आले नाहीत. त्यामुळे अतुल गोविंद वाकडे यांना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी फूस लावून कोठेतरी, कोणत्यातरी कारणामुळे पळवून घेऊन गेले असावेत. अशी फिर्याद त्यांच्या पत्नीने त दिली आहे.या फिर्यादीवरून अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायालय अंतर्गत)